RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | रविवार, दि. १७ जुलै २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

YouTube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360






# नदीकाठावरील बळीराजा हवालदिल

**गोंडपिपरी / सुरज माडुरवार**
शेतात पाणी,घरात आणि वस्तीतही पाणीच पाणी.या पावसाने बळीराजाच्या डोळ्यात देखील पाणी आनलं.जिथे माणस पुरापासून स्वताचा जिव वाचविण्यासाठी धडपडत आहे.तिथे हा बळीराजा शेतातील खत सूरक्षितस्थळी हलविण्यासाठी पुरात मानुसभर उतरला आहे.या पुरामुळे बळीराजाची स्थिती हवालदिल झाली आहे.गोंडपिपरी तालुक्यातील अडेगावातील ही परिस्थिती खचलेल्या बळीराजाची बिकट स्थिती दर्शवणारा आहे.

> गोंडपिपरी तालुक्याच्या सिमावर्ती भागातील गावकऱ्यांनी काही दिवस सतर्क राहण्याची गरज आहे.शेतकऱ्यांनी सुद्धा हवामानाचा अंदाज घेऊन पाऊले उचलावी.तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सर्वे सुरु आहेत.
>
> **- के.डी.मेश्राम,तहसिलदार,गोंडपिपरी.**

तेलंगणा सीमेवरील वर्धा नदीला आलेल्या पुरातील पाण्याचा सर्वाधिक फटका शेतीला बसला.मोठ्या कष्टाने उभी केलेली शेती पाण्याखाली गेली.पुर वाढतच आहे.त्यामुळं उर्वरीत शेती पाण्याखाली वाढण्याचा धोका वाढला आहे.शेतपिकांना खत

## शेतात फसलेले खत वाचविण्यासाठी डोंग्याचा आधार

टाकण्यासाठी खत पूर्वीच शेतात नेल्या गेलं होतं.अशावेळी नदीची पातळी वाढत असल्याने खत पाण्याखाली जाण्याचा धोका वाढला होता.यातच डोग्यांने पुरातून मार्ग काढीत बळीराजा खत वाचविण्यासाठी धडपड करीत आहे.पिके पाण्याखाली आहेत.
कुजण्याचा धोका वाढला आहे. अशावेळी दुबारपेरणी केल्यावर किमान सध्यातरी उरलेसुरले खत कामी येईल,ही आशा बळीराजाला आहे.त्यामूळं जिवघेण्या पुरातून मार्ग काढीत बळीराजा खत सूरक्षितस्थळी हलवित आहे.मात्र त्यांचा हा डोंग्यावाटे होणारा प्रवास जिवघेना ठरला आहे.या पुराचा फटका अडेगांव, दरुर, नंदवर्धन, शिवणी देशपांडे, पानोरा येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला आहे...

## पुराचे पाणी गोट फॉर्ममध्ये शिरल्याने १६ बकऱ्यांचा मृत्यू



**राजुरा / प्रतिनिधी**
बामणी-राजुरा मार्गालगतच्या मोहम्मद शबीर यांच्या मालकीच्या शेतातील गोट फॉर्म येथे नेहमी प्रमाणे सत्तावीस बकऱ्या होत्या, पुराचे पाणी आपल्या शेतात येणार नाही या भ्रमाने त्यांना आपत्ती व्यवस्थापन च्या कर्मचाऱ्यांना सांगितले मात्र अचानक पुराचे पाणी वाढले आणि गोट फॉर्म मध्ये शिरले तेव्हा मोहम्मद शब्बीर हे स्वतःचा जीव वाचवित नजीकच्या साई मंदिर येथे आश्रय घेऊन थांबले. पाणी वाढत असल्याने पुराचे पाणी गोट फॉर्म मध्ये शिरले आणि यात सत्तावीस पैकी पंधरा बकऱ्या मरण पावला यात एका बकरीने लहान पिल्याला जन्म दिला ते पिल्लू सुद्धा पाण्यात मरण पावले उर्वरित बारा बकऱ्या यात जिवंत वाचल्या असल्या तरी मोहम्मद शबीर यांचे मोठे नुकसान झाले.
बल्लारपूर येथील बुद्ध नगर मध्ये राहणारा मोहम्मद शबीर यांनी राजुरा बामणी मार्गावर शेत घेऊन त्या ठिकाणी शेती पूरक व्यवसाय म्हणून शेळी पालन चा व्यवसाय सुरू केला. मागील दहा दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसाने नदी नाले ओसंबून वाहत होते. वर्धा नदी दुथडी झाल्यानंतर बामणी-राजुरा मार्गावरील पुलिया पाण्याखाली गेल्याने राजुरा कडे येणाऱ्या मार्गावर पुराचे पाणी आल्यामुळे मधातच मार्ग बंद झाला यामुळे आपत्ती व्यवस्थापन पथकाला गोट फॉर्म पर्यंत पोहचता आले नाही. साई मंदिर परिसरात आश्रय घेऊन असलेले मोहम्मद शबीर यांना आपत्ती व्यवस्थापन पथकाने सुरक्षित स्थळी येण्यास सांगितले असता आपल्या बकऱ्यांच्या दृष्टीने त्यांनी तिथेच राहणे पसंद केले. पुराचे पाणी ओसरल्यानंतर महसूल चे कर्मचारी गोट फॉर्म पर्यंत जाऊन पोहचले असता त्या ठिकाणी पंधरा बकऱ्या आणि एक छोटेसे बकरीचे पिल्लू मृत होते तर बारा बकऱ्या जिवंत असल्याचे दिसून आल्या.
तहसीलदार हरीश गाडे, मंडळ अधिकारी निरंजन गोरे, तलाठी विल्सन नांदेकर, पशुवैद्यकीय अधिकारी जिल्हेवार, आक्रोश जुलमे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. यात शेळी मालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

## झाड कोसळल्याने झाले घरांचे नुकसान, मदतीला धावले आमदार जोरगेवार

### पिडीत कुटुंबीयांना केली आर्थिक मदत



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
झाड कोसळल्याने घरांचे नुकसान झाल्याची घटना आज रयतवारी कॉलरी येथे घडली. घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर परिसर गाठत नुकसान झालेल्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांना आर्थिक मदत केली आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे महानगर जिल्हाध्यक्ष पंकज गुप्ता, माजी नगर सेवक राजेश रेवल्लीवार, शंकर दंतुलवार आदिंची उपस्थिती होती.
चंद्रपूरात पावसाचा जोर मंदावला असला तरी या पावसाने अनेकांचे मोठे नुकसान केले आहे. अशा कुटुंबीयांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आर्थिक मदत केल्या जात आहे. दरम्यान कडूलिंबाचे झाड कोसळल्याने रयतवारी येथील सुरेश सदनलवार, राजु झंजलवार, शुभम पोतनवार आणि सुरज अडपेवार यांच्या घराचे मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी रयतवारी कॉलरी परिसरात जात सदर नुकसानग्रस्त कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी घटनेची पाहणी करत सदर कुटुंबीयांना आमदार किशोर जोरगेवार यांनी आर्थिक मदत केली आहे. तसेच प्रशासनातर्फेही सदर कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे.

## प्राध्यापकांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंचचे कुलगुरूंना निवेदन



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांनी नुकत्याच जाहीर केलेल्या विविध प्राधिकरणाच्या २०२२ निवडणूकीकरिता आपल्या संकेतस्थळावर मतदारांच्या यादया प्रकाशित केलेल्या आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या अंतर्गत येणा?या विविध संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षक यांची माहिती विद्यापीठाद्वारे मागविण्यात आली होती. ही माहिती संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठात सादर करणे आवश्यक होते. मात्र अनेकदा मुदतवाढ देऊनही अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिलेल्या मुदतीत ही माहिती विद्यापीठात सादर केली नाही. त्यामुळे अनेक प्राध्यापकांची नावे विद्याशाखा निहाय निर्वाचन गणांच्या मतदार याद्यांमध्ये समाविष्ट करण्यात आली नाहीत. प्राचार्यांनी केलेल्या चुकीची शिक्षा अशा अनेक प्राध्यापकांना भोगावी लागणार असून निवडणूक लढविण्याच्या व मतदान करण्याच्या न्याय हक्कापासून त्यांना वंचित रहावे लागणार आहे. अशा प्राध्यापकांच्या नावाचा मतदार यादीत समावेश करण्यात यावा, व प्राचार्यांनी केलेल्या चुकीसाठी प्राचार्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंच, यंग टीचर्स असोसिएशन, नुटा संघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स असोसिएशन या सर्व संघटनांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनातून केली आहे. दिनांक ४ जुलै २०२२ ला मा. कुलसचिव तथा निवडणूक निणऱ्य अधिकारी यांच्यासोबत झालेल्या चर्चेतही गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी ही मागणी लावून धरली होती. आज दिनांक १६ जुलैला विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या अपिलीय सुनावणीतही गोंडवाना विद्यापीठ शिक्षण मंचने हा मुद्दा उपस्थित करून कुलगुरूंशी चर्चा केली. मात्र काही तांत्रिक कारणामुळे आता नव्याने मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे समाविष्ट करता येणार नाहीत, अशी भूमिका कुलगुरूंनी विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने मांडल्याने अनेक प्राध्यापक त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित राहणार आहेत. म्हणून शेवटी सर्व संघटनांच्या वतीने एक निवेदन देऊन यावर तोडगा काढण्याची विनंती केली. याबाबत कायदेशीर बाबी तपासून काय करता येईल याबाबत विचार करण्याचे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले आहे. शिवाय ज्या प्राचार्यांनी अनवधानाने किंवा जाणीवपूर्वक प्राध्यापकांना मतदानापासून वंचित ठेवले, त्यावर कडक कारवाई करण्याचेही आश्वासन कुलगुरूंनी दिले. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत विविध प्राध्यापक संघटनांचे पदाधिकारी निवेदन देतांना उपस्थित होते.

## वेकोलि व महाऔष्णीक विद्युत केंद्राने लोकांच्या समस्या तातडीने सोडवाव्या : आ. मुनगंटीवार

### आभासी बैठकीत दिले अधिकाऱ्यांना निर्देश

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या वेकोलि व महाऔष्णीक विद्युत केंद्राशी संबंधित विषयांकरिता आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आभासी बैठक घेतली. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. भटाळी गावाबाहेर वेकोलिच्या ओव्हरबर्डनमुळे यावर्षी पुरस्थिती निर्माण झाली व अनेक घरांमध्ये पाणी गेले. ज्यामुळे नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. वेकोलि ने त्यावर पक्का नाला बांधून पाणी नदीकडे वळते करावे व ज्या नागरिकांचे नुकसान झाले आहे त्यांना ताबडतोब नुकसान भरपाई द्यावी, असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी वेकोलि अधिकाऱ्यांना दिले. त्याचबरोबर भटाळी गावाचे पुनर्वसन ताबडतोब करावे असेही त्यांनी सांगीतले. तसेच ओव्हरबर्डनमुळे चांदसुर्ला गावातील घरांमध्ये व शेतीत पाणी घुसले ज्याने तेथील नागरिकांचे नुकसान झाले. तेथेही नाल्याचे बांधकाम करणाऱ्याचे निर्देश त्यांनी वेकोलि अधिकाऱ्यांना दिले. चंद्रपूर शहरात डीआरसी



जवळ असणारी हाय व्हॉटेज लाईन भुमीगत करावी अशी मागणी एका पदाधिका-याने केली. ज्यावर आ. मुनगंटीवार यांनी पाहणी करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.
महाऔष्णीक विद्युत केंद्राने दरवर्षी नाल्याच्या साईडला असलेली जाळी काढली होती. ज्यामुळे कचरा व पाणी ताबडतोब निघण्यास मदत झाली. परंतु यावर्षी ही जाळी न काढल्यामुळे दुर्गापूर गावामध्ये व वेकोलि वसाहतीमध्ये पाणी जमा झाले. ज्याने लोकांचे नुकसान झाले. ही जाळी ताबडतोब काढण्याचे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. त्याचबरोबर द्वारकानगरीत नाला बांधकाम करण्यासंदर्भात तेथील लोकप्रतिनिधींबरोबर प्रत्यक्ष जागेवर जावून पाहणी करावी व आवश्यकतेनुसार नाला बांधून द्यावा, असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले. याप्रसंगी बोलताना आ. मुनगंटीवार म्हणाले, सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे रस्ते सीमेटचे करावे, जेणेकरून नागरिकांना रस्ते खराब होण्याचा त्रास होणार नाही. वेकोलि ने सर्व रस्त्यांवरील कचरा, माती ताबडतोब साफ करावी असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी यावेळी दिले. वेकोलि जे रस्ते स्वतः करू शकत नसेल त्यांची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाला देवून त्यांच्याकडून करवून घ्यावी. वेकोलि व महाऔष्णीक विद्युत केंद्राने नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्या, असे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी याप्रसंगी दिले.
बैठकीला भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, महाऔष्णीक विद्युत केंद्राचे कार्यकारी निदेशक पंकज सपाटे व त्यांचे अधिकारी, चंद्रपूर वेकोलिचे मुख्य महाव्यवस्थापक साबीर व त्यांचे अधिकारी, महानगर उपाध्यक्ष रामपाल सिह, विलास टेंभुर्णे, नामदेव आसुटकर, शांताराम चौखे, हनुमान काकडे, रोशनी खान, राकेश गौरकार, सुभाष गौरकार, सुभाष कासनगोट्टूवार, शिला चव्हाण, सुनिल बरीयेकर, अंजली घोटेकर, अनिल डोंगरे, श्रीनिवास जंगमवार, संजय यादव, मदन चिवंडे, उपस्थित होते.

### पुरपीडीतांना आ. मुनगंटीवार यांच्या माध्यमातून अनाज, किराणा किट आणि ताडपत्रीचे वितरण



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
अतिवृष्टीने जिल्ह्यातील इरई नदीला पुर आला आहे . त्यामुळे चंद्रपूर शहरासह लगतच्या लखमापूरला पुराचा फटका बसला.पुराची तीव्रता अधिक असल्याने येथिल आझादनगर झोपडपट्टीतील अनेक घरांची पडझड होऊन जनजीवन विस्कळीत झाले आहे . या झोपडपट्टी भागात राहणाऱ्या पुरपीडीतांना आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या माध्यमातून अनाज, किराणा किट आणि ताडपत्रीचे वितरण करण्यात येत आहे. आज पुरपीडीतांना या साहित्यांचे वाटप भाजप जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांनी केले .
यावेळी, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, जिल्हा उपाध्यक्ष रामपाल सिंह, भाजयुमोचे प्रदेश सचिव अनिल डोंगरे, माजी जि. प. सदस्य विलास टेंभुर्णे, शांताराम चौके, नामदेव आसुटकर, सुदर्शन निषाद यांचेसह आदी मंडळी उपस्थित होते.

## महावितरणचा निष्काळजीपणा बेतला शेतकऱ्याच्या जीवावर

### जिवंत विद्युत ताराच्या स्पर्शाने शेतकऱ्याचा मृत्यू



**गोंडपिपरी / प्रतिनिधी**
गोंडपिपरी तालुक्यातील सकमुर (चेकबापूर) येथील शेतकऱ्याचा जिवंत विद्युत ताराच्या स्पर्शामुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि. १६ शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.
राजेश्वर मोतीराम तोहगावकर वय (५५) असे मृतक शेतकऱ्याचे नाव आहे.गेल्या दीड दोन महिन्यापासून वादळामुळे सकमुरात शेतातील काही विद्युत खांब कोसळले होते.त्याची तक्रार व माहिती शेतकऱ्यांनी महावितरण विभागाला दिली.त्यांनी विद्युत पुरवठा खंडीत केला पण दोन महिने लोटूनदेखील खांब उभे केले नाही तुटलेल्या तारांची विल्हेवाट लावली नाही.रोज प्रमाणे राजेश्वर आपल्या शेतात त्या तारांवरून जात होता अचानक त्याला करंट लागला त्यानंतर तो तारावरच कोसळला शरीराला जिथे तार स्पर्श झाले त्या ठिकाणी जखम झाली असून जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.आपल्या कर्तव्यात निष्काळजी करणाऱ्या महावितरण च्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कडवं कारवाई करावी सोबत कुटुंबियांना आर्थिक मदत करावी अशी मागणी अशोक रेचनकर यांच्यासह गावकऱ्यांनी केली आहे. महावितरण चे अधिकारी घटनास्थळी आल्याशिवाय प्रेत उचलणार नाही अशी भूमिका कुटुंबीयांनी घेतली आहे.राजेश्वर तोहगावकर यांच्या पच्यात दोन मुले, पत्नी असून तोहगावकर कुटुंबावर शोककळा पसरली आहे

मराठी साप्ताहिक
सह्याद्रीचा राखणदार

# सावली-हरंबा रोड वरील जीबगाव जवळ रस्त्यावर ट्रक फसला, ३ तासांपासून रस्ता बंद

## सार्वजनिक बांधकाम विभाग व सिंचाई विभागाच्या दिरंगाई चा फटका सावली तालुक्यातील हरांबा जिबगांव साखरी मार्गावरील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
सावली तालुक्यातील हरांबा लोंढोली,जिबगाव, साखरी मार्गावरील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून डांबरीकरण उखळल्याने अनेक ठिकाणी उघडले आहे. या मार्गावरील मोठे खड्डे धोकादायक ठरत आहेत.



सध्या पावसाचे दिवस असल्याने मोठ्या खड्यात नेमका पाणी किती आहे हे लक्षात येतं नाहीं हेच खडे अपघातास कारणीभूत ठरतात जिबगांव हरांबा परीसरातील नागरीकाचे तालुक्याच्या ठिकाणी तहशिल,प स,महाविद्यालय,शाळा दवाखाना ,बाजार पेठ करीता दररोज ये-जा असते. तसेच रात्री व दिवसा मोठ्या प्रमाणात वाहनाची रेलचेल सुरू असते. त्यामुळे रस्त्यावर खड्डयाचे साम्राज्य झाले असून रस्त्यांवर दुरवस्था झाली आहे.
रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण उघडले असून दोन ते तीन फुटाचे पसरट खड्डे पडले आहेत तर गोसेखुर्द अतर्गत पाईप लाईन चे काम हे थातूर मातूर केल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे.कारण या मार्गावरून गोसे विभाग पाईप टाकली त्यात दगड,चुरी भरून व्यवस्थित करायला पाहिजे मात्र त्यात माती टाकून बुजविले मात्र पावसाच्या पाण्याने ते माती खाली गेल्याने वाहने फसायला सुरुवात झाली आहे.
दुपारी १२ वाजता च्या दरम्यान एक ट्रक फसल्याने सावली-हरंबा मार्गावरील वाहतूक ही ३ तासापासून बंद आहे.वाहन बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.मात्र या निमित्याने त्यांचा गैरप्रकार समोर आलेला आहे. अनेक वाहन फस्त असल्याने गोसेविभाग व बाधकाम विभागाना विचारणा केली असता उडवाउडविचे उत्तर देत दुर्लक्ष होत असल्याने या मार्गावर मोठे खड्डे पडले असून वाहन चालकास वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागते रस्त्याची एवढी दुरवस्था झाली आहे असून सावली बांधकाम विभागचे दुलर्क्ष होताना दिसत आहे.असा आरोप वाहन धारकांकडून केला जात आहे . एकीकडे पालकमंत्री भुमीपुजन केल्याचे बोर्ड तर दुसरी कडे निधी नसल्यामुळे बाधकाम विभागाचे अधिकारी यांचे कडुन सांगण्यात येत आहे निधी अभावी सावली हरांबा रोडचे काम थांबले असल्याचे सांगितले असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत तरी वेळीच लक्ष देउन या रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# राजुऱ्याच्या चुनाभट्टी वार्डातील महिलांनी मजुरांची भूक भागवली



**राजुरा / प्रतिनिधी**
शहरात मागील आठवड्यापासून मुसळधार पाऊस पडत असल्याने नदी नाले ओसंडून वाहत आहे.दरम्यान वर्धा नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. त्यामुळे शहरात ट्रकांच्या रांगा लागल्या आहे.याच पुरात अडकलेल्या मजुरांना चुनभट्टी वार्डातील महिलांनी मसाला भातचे वाटप करून त्यांची भूक भागवली आहे. ....मागील काही दिवसांपासून पावसाची धुवांधार बॅटिंग सुरू आहे. त्यामुळे वर्धा नदीला पूर आला आहे.पुलावरून वाहतूक बंद करण्यात आल्याने अनेक चालक व वाहक अडकून पडले आहे. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने अनेकांनी मदतीचा हात पुढे केला आहे. दरम्यान हैदराबाद वरून ६० ते ७० मजूर पुरामुळे अडकले असून त्यांच्या जेवणाची कोणतीही सोय नसल्याची बाब चुनभट्टी वार्डातील महिलांच्या लक्षात येताच त्यांनी मसालाभात वाटप केले. या सामाजिक कार्यात सुधाताई चिडे,जनाबाई मालेकर, शोभा देवाळकर. उपरे आजी ,निर्मला चिडे,लुतेश उपरे,संदीप पारखी,सागर भटपल्लीवार, मोहंमद अहमद कुरेशी यांनी हातभार लावला.

## निधन वार्ता

### पांडुरंग शामराव अंकुश



कुरुल ता.मोहोळ येथील कै पांडुरंग शामराव अंकुश (वय ७२) यांचे शुक्रवार (दिः१५ ) रोजी पहाटे दुःखद निधन झाले.अत्यविधी १२:३० ला कुरुल येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्य संस्कार करण्यात आला. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन सुना,तीन नातु,तीन नाती,अशा परिवार होता.ते शिक्षक संतोष पांडुरंग अंकुश व सोमनाथ अंकुश यांचे वडील होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत बंदर जखमी

**सिंदेवाही / प्रतिनिधी**
सकाळच्या सुमारास अज्ञात वाहनाच्या धडकेत तळोधी बा. दरम्यान मूल- नागपूर रोडवर एका गंभीर जखमी वानराला स्वाब संस्था व वन विभागाच्या वतीने संयुक्तपणे रेस्क्यू करून उपचारा करीता पशू वैद्यकीय दवाखान्यात दाखल करून माणुसकीचे दर्शन घडविले . परंतु उपचारा दरम्यान वाणराचा मृत्यु झाला .
सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत परत एक वानर गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळतात स्वाब संस्थेचे सदस्य व वन विभागाच्या कर्मचारी यांनी जखमी वानराला संयुक्तपणे रेस्क्यू करून उपचाराकरिता नेले. विशेष म्हणजे या रस्त्याने आपल्या विभागीय कामाकरता जात असताना चंद्रपूरचे मुख्य वन संरक्षण अधिकारी लोणकर हे सुद्धा आपली कार थांबून हा रेस्क्यू होईपर्यंत घटनास्थळी उपस्थित राहिले. त्यानंतर जखमी वानराला तळोधी येथील पशु चिकित्सालयात प्राथमिक उपचार करून शिंदेवाही येथील पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे उपचारासाठी नेण्यात आले.

# वरोरा एमआयडीसी ते जिएमआर रस्त्याचे काम सात दिवसात पूर्ण करा

## खासदार, आमदार धानोरकर दाम्पत्यांची जिल्हाप्रशासनाकडे मागणी

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
वरोरा येथील एमआयडीसी ते जिएमआर रस्त्याच्या माध्यमातून दोन मोठ्या कंपनीतील कामगार तसेच इतर वाहनांची ये - जा सुरु असते. परंतु या रस्त्याची स्तिथी अत्यंत असुरक्षित व धोकादायक असल्याने अनेक अपघात होत आहे. त्यामुळे एमआयडीसी ते जिएमआर रस्त्याचे काम सात दिवसात पूर्ण करा अशी लोकहितकारी मागणी खासदार बाळू धानोरकर यांनी केली.



नियोजन भवन येथे बैठक पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, एमआयडीसी बुरेले, जिएमआरचे विनोद पुसदकर, अक्षय ठाकरे यांची उपस्थिती होती.
एमआयडीसी च्या उड्डाण पुलासाठी जे बांधकाम सुरु आहे. त्यामुळे पर्यायी मार्ग बांधण्यात आला. परंतु तो सुद्धा पूर्णतः खराब झाल्याने रत्नमाला - वरोरा - मोहबाळा हा ग्रामीण रस्ता वापरला जात आहे. यामुळे गावक?यांच्या सुरक्षेचा व रस्त्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या मार्गावर मोठं मोठे खड्डे पडले आहे. हा रस्ता सात दिवसात दुरुस्त करण्याची मागणी खासदार, आमदार धानोरकर दाम्पत्यांनी केली आहे.

# अतिवष्टी, पूरपरिस्थिती लक्षात घेऊन सरकारने राज्यात ओला दुष्काळ घोषित करावा

## रिना पाटील यांची मागणी



**चिमूर / प्रतिनिधी**
तालुक्यात मागील आठ ते दहा दिवसांपासून सतत पावसाने थैमान मांडले असून जिल्यात सगळीकडे पाणीच पाणी झाले, शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली ,पिके सडली,बियाणे सडले, शेतकऱ्यांचे भरमसाठ नुकसान झाले, पावसामुळे,शाळा कॉलेजेस बंद ठेवावे लागले, गावागावात घरांची पडझड झाली, रस्ते वाहून गेली,पुरात जनावरे, माणसं वाहून गेली, आधीच दोन वर्ष कोरोनाने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना अजून अतिृष्टीचा जोरदार फटका बसलेला आहे,
उधारीवर घेतलेल्या बियानांचे ,खताची परत फेड करायची कशी हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांपुढे आ वासून उभा आहे, या गंभीर परिस्थितीत सरकारने राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी.अशी मागणी वडसी ग्राम पंचायत सदस्या रिना पाटील यांनी केली आहे.वडसी परीसरात हत्तीनाला व उमानदीला भयानक पुर आल्यामुळे या परीसरातील शेतकऱ्यांचे पिकं आजही पाण्यात डुंबुन असल्याने धानाचे पिक खराब होत आहे. शेतकऱ्याना दुसऱ्यांदा पऱ्हे टाकण्याची वेळ आली आहे तरी शासनाने त्वरीत पंचनामे करून शेतकरी वर्गाला काही तरी मदत करावी अशी मागणी रिना पाटील यांनी केली आहे.

# पुरात अडकलेल्या ट्रक चालकांना फळ व बिस्कीट वाटप

## आदर्श शाळेतील राष्ट्रीय हरित सेना व स्काऊट गाईड यांचा संयुक्त उपक्रम

**राजुरा / प्रतिनिधी**
बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर तथा आदर्श हायस्कूल, राजुरा येथील राष्ट्रीय हरित सेना व स्काऊट गाईड युनिट च्या संयुक्त विद्यमाने राजुरा येथे वर्धा नदीवरील आलेल्या पुरामुळे अडकलेल्या ट्रक चालकांना फळ व बिस्कीटचे वाटप करण्यात आले.



दि. १३ जुलै पासून चंद्रपूर -हैद्राबाद राज्य महामार्गावरील वर्धा नदी व राजुरा सास्ती मार्गावरील धोपटाळा येथील पुलावर आलेल्या पुराच्या पाण्यामुळे दक्षिण भागातून येणा?या शेकडो ट्रकांच्या रांगा राजुरा येथे लागलेल्या आहे. या ट्रक चालकांना दि.१६ जुलै ला सकाळी फळ व बिस्कीट चे वाटप करण्यात आले. राष्ट्रीय हरित सेना प्रमुख बादल बेले यांच्या पुढाकारातून व आदर्श प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नलिनी पिंगे, आदर्श हायस्कूलचे मुख्याध्यापक सारीपुत्र जांभूळकर यांच्या मार्गदर्शनात सदर उपक्रम घेण्यात आला. यावेळी सहायक शिक्षक रुपेश चिडे, विध्यार्थी प्रमुख राधिका चेडे, साहिल नंदीगमवार आदीसह राष्ट्रीय हरीत सेना विभागाचे विध्यार्थी तसेच स्काऊट गाईड युनिट चे विध्यार्थी प्रामुख्याने सहभागी झाले. पर्यावरण संवर्धना सोबतच मानवता सेवा करणे हे आपले कर्तव्य असून यापूर्वी आदर्श शाळेतील विध्यार्थीनी अनेक समाजपायोगी उपक्रम घेतले आहे. यापूर्वीही पूरग्रस्त भागातील गरजू करिता निधी संकलन करून राजुरा तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री सहायता निधीत ती रक्कम दिली व विविध संदेशात्मक उपक्रम घेऊन या शाळेतील विध्यार्थी नेहमीच जनजागृतीचा प्रयत्न करीत असतात. या विध्यार्थीनी पुरात अडकलेल्या ट्रक चालकांना फळ व बिस्कीट चे वाटप केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होतं आहे.

# गुरुदेव सेवकांकडून पंढरपुरला चंद्रभागेच्या तीरावर स्वच्छता अभियान



**चंद्रपूर / प्रतिनिधी**
श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या सेवकांनी पंढरपूर येथे आषाढी एकादशीला वारीला येणार्या लाखो भाविकांच्या आगमना नंतर चंद्रभागा नदीच्या तीरावर साचलेली घाण साफ करुन स्वच्छता अभियान राबविले. गेल्या आठ वर्षांपासून संत तुकडोजी महाराज श्री गुरुदेव सेवा मंडळ, ग्रामसंरक्षण दल, गुरुदेव सेवकांकडून स्वच्छता अभियान राबविल्या जात आहे. गुरुदेव सेवा मंडळाच्या सेवकांच्या सामाजिक कार्याचे वारकर्यांसह शासकीय यंत्रणेकडून सुद्धा कौतुक करण्यात आले. चंद्रभागा स्वच्छता अभियान दि. ९,१०,११,१२ जुलै रोजी सकाळी ७ ते ११ वाजता दरम्यान करण्यात आले. स्वच्छता अभियानाचे उद्घाटक म्हणून विलास भोयर, विशाल गावंडे, रुपेश ढोके, सुरेश चौधरी, डॉ. अरविंद ठाकरे, देवराव ठावरी आदि उपस्थित होते.१० जुलैला कार्यकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. उद्घाटक म्हणून गुलाबराव महाराज, सत्यपाल महाराज, भाऊसाहेब थुटे, भु.वैकूंठ समिती अध्यक्ष पंढरपूर अध्यक्ष प्राचार्य देठे, भीमराव जामदार महाराज बेलवाडी, बारामती, नरेंद्र जिवतोडे, रवि मानव, डॉ. अंकूश आगलावे उत्सव समिती अध्यक्ष, पंढरपूर, बालाजी सुर्यवंशी, शिवराज जवळेकर, ऋषीकेश रोडे, दिलीपराव भोयर उपस्थित होते.दि. १२ जुलै रोजी स्वच्छता अभियानाचा समारोप करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर बंडगर, सांगोला, अशोक भोसले, करकंब भोसे, जगन्नाथ दातारकर, सेवकराम ग्रामगिता तत्वज्ञान दर्शन मंदिर, पंढरपूर उपस्थित होते. दि. १३ जुलै रोजी गुरुपोर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामगिता तत्वज्ञान दर्शन मंदिर, पंढरपूरचे संचालक सेवकराम मिलमिले, भु. वैकूंठ समिती, पंढरपूरचे प्राचार्य जनार्धन देठे यांनी केले. पंढरपूरच्या आषाढी एकादशीला संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो वारकरी विठ्ठलाचे दर्शन करण्या करीता येत असतात. एका वेळेस लाखो भाविक भक्त पंढरपूरला चंद्रभागा नदि किनारी जमा होत असल्याने मोठ्या प्रमाणात घाण निर्माण होत असते. गुरुदेव संत तुकडोजी महाराज तसेच संत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रेरणेतून समाज कार्य करणारे गुरुदेव सेवक गेल्या आठ वर्षांपासून चंद्रभागा स्वच्छता अभियान राबवित आहे.

# पुरामुळे ७हजार ८८६ हेक्टर पैकी ८० टक्के पाण्याखाली

## बल्लारपूर तालुक्यात ६८ टक्के पर्जन्यमान, , शेतकरी दुबार पेरणीच्या संकटामुळे हवालदिल

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
बल्लारपूर तालुक्यातील कृषी क्षेत्र कोरडवाहू आहे. जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान सरासरी ११८५.६ मी. मि. एका हंगामात पाऊस पडतो. या पावसावर शेतकऱ्यांचा खरीप व रब्बी हंगाम अवलंबून आहे. तालुक्यात ७ हजार ८८६ हेक्टर इतके खरीप हंगामाचे कृषी क्षेत्र आहे. यातील ८० टक्क्यावर कृषी क्षेत्र यावर्षी वर्धा नदीच्या पुरामुळे बाधित झाले आहे. परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आल्याने तो हवालदिल झाला आहे.
आजतागायत बल्लारपूर तालुक्यात ६८.२ टक्के पर्जन्यमान झाले असून मागील वर्षीच्या तुलनेत ३१.१ टक्के इतका अधिक आहे.
बल्लारपूर तालुक्यात खरीप



हंगामाचे एकूण कृषी क्षेत्र ७ हजार ८८६ हेक्टर आर इतके आहे.शेतकऱ्यांनी जीवापाड मेहनतीने कापूस, सोयाबीन, भात, मूग, भाजीपाला व अन्य कडधान्याची लागवड केली. शेतकऱ्यांचा मुख्य हंगाम खरीपाचाच आहे. मात्र मागील सहा दिवसापासून निसर्ग शेतकऱ्यांवर कोपला.तब्बल १० वर्षाच्या प्रतीक्षेनंतर वर्धा नदी शेतकऱ्यांवर कोपली. वर्धा नदीच्या प्रकोपाने शेतकरी घायाळ झाला. पुरामुळे बळीराजाचा खरीप हंगाम हिरवला.८० टक्के खरीपाचे कृषी क्षेत्र पुराच्या पाण्याखाली तीन दिवस राहिल्याने उभ्या पिकांची नासाडी झाली आहे.
ग्रामीण भागातील अर्थ व्यवस्था कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांना देखील एका वर्षाच्या कृषी हंगमावर वर्षभराची उदरनिर्वाहासाठी तजवीज करावी लागते. यासाठी बळीराजा बी -बियाणे, शेतीची मशागत, खते, मजुरी आदींचे नियोजन करून उत्पन्न वाढीसाठी जीव तोडून शेतात राबतो. मात्र निसर्ग शेतकऱ्यांवर नेहमी कोपतो. कधी पूर, कधी निसर्गाचा दगा तर कधी मानव निर्मित समस्या शेतकऱ्यांची दैना करते. यातून शेतकऱ्यांना सावरण्याची संधीच मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांचे अवसान गळते. या वर्षी पर्जन्यमान बरे होईल म्हणून हवामान विभागाने अवगत केले. यामुळे शेतकरी आनंदात होता. मात्र बल्लारपूर तालुक्यात निसर्ग चांगलाच बरसाला. सलग सहा दिवसाच्या पावसाने वर्धा नदीला पूर आला. यात तालुक्यातील शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले. सलग तीन दिवस शेतातील पिके पुराच्या पाण्यात राहिल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.
बल्लारपूर तालुक्यात मागील वर्षी १५ जुलै पर्यंत ४४० मि. मी. इतका पाऊस पडला होता. त्याची टक्केवारी ३७.१ इतकी होती. मात्र यावर्षी याच तारखेत ६८२ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. हे प्रमाण ५७.५ इतके आहे. अजून अडीच महिने पावसाचे आहे. मागील वर्षी बल्लारपूर तालुक्यात जून ते सप्टेंबर महिन्यादरम्यान १४३६ मि. मी. पावसाची नोंद असून सरासरीच्या तुलनेत अधिक होती.शासनाने खरीप हंगामाचे पंचनामे करून तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी बल्लारपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे.

# रासायनिक खताच्या नुकसान भरपाईसाठी शासन निर्णय करा

**राजुरा / प्रतिनिधी**
विधानसभा क्षेत्रातील राजुरा, गोंडपीपरी, कोरपना व जिवती तालुक्यात झालेल्या संततधार पावसामुळे सर्वत्र शेतात पुराचे पाणी आल्याने शेतकऱ्यांनी शेतात वर्षभरासाठी शेत पिकांकरिता साठविलेले रासायनिक खत पाण्यात विरघडले तर बहुतांश खत पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून नुकसानीची भरपाईसाठी शासनाने विशेष बाब म्हणून शासन निर्णय करण्याबाबत व शेतपिके व इतर नुकसानीची तात्काळ पंचनामे करून मदत देण्याबाबतची मागणी माजी आमदार सुदर्शन निमकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.
शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्त्यांचा (पांदन रस्त्यांचा) अभाव असल्यामुळे आजही शेतकऱ्यांना शेतात चिखल तुडवीत जावे लागत आहे. पिकांसाठी लागणारे खत चिखलातून बैलबंडीने बांध्यावर नेता येत नसल्याने व मागील आठ ते दहा वर्षापासून नदिला पुर येत नसल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी पावसाळ्या अगोदरच शेतपिकांसाठी लागणारे वर्षभराचे रासायणीक खते शेतामध्ये साठवून ठेवलेले होते. मात्र अचानक आलेल्या पुराच्या पाण्याने शेतातील लाखो रुपयांचे रासायणीक खते पाण्यात विरघले असून बरेच खते पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले आहे. अशा शेतकऱ्यांच्या रासायनिक खतांच्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत मिळण्याकरीता विशेष बाब म्हणून शासन निर्णय काढणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच पावसामुळे तालुक्यातील शेती मोठ्या प्रमाणात पुराच्या पाण्याखाली गेली असल्याने आधीच बियाने वापत नसल्याने शेतकऱ्यांवर आलेल्या दुबार पेरणीचे संकट असतांना पुन्हा एकदा पुराच्या पाण्याने शेतातील कपाशी, सोयाबीन व धान पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतपिक संपूर्ण उध्वस्त झाले आहे यामुळे शेतकरी पूर्णपणे खचला आहे.
राजुरा विधानसभा क्षेत्रा अंतर्गत गोंडपिपरी तालुक्यातील चार हजार लोकवस्ती असलेल्या तोहगाव या गावासभोवताल नेहमी वर्धा नदिच्या पुराचे पाणी येऊन पूर्णतः संपर्क तुटत असतो. याकरीता वन विकास महामंडळाच्या चार नंबर कॅम्प कन्हाळगांव रस्त्यावर पुलाचे बांधकाम करणे अत्यंत आवश्क आहे. या अगोदर सुद्धा पुल प्रस्तावित केला होता परंतु पुल बांधण्यात आला नाही. व तसेच राजुरा तालुक्यातील कोलगांव हे गांव वेकोलीच्या कोळसा खाणी च्या पुर्नवसनात आहे. या परिसरात मंजूर असलेल्या खुल्या कोळसा खाणीकरीता जमीन अधिग्रहीत करून प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देऊन गावाचे पुर्नवसन करणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी मजद्द आमदार यांनी निवेदनातून केली आहे.